सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# मध्यमवर्गीयांना 'लक्ष्मी'चा आशीर्वाद! १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त

## निर्मला सीतारामन यांची बजेटमध्ये घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात सीतारमण यांनी टॅक्स बाबतीत एक मोठी घोषणा केली आहे. नवीन कर प्रणालीमध्ये १२ लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर आयकर द्यावा लागणार नाही. काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया दिली होती. 'धनदेवता लक्ष्मी गरीब व मध्यमवर्गीयांना आशीर्वाद देईल, अशी मला आशा आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी म्हणाले होते. दरम्यान, कर प्रणालीमध्ये मध्यमवर्गीयांना मोठं गिफ्ट दिलं आहे.

१२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही आयकर लागणार नाही. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी घोषणेत सांगितले की, पुढील आठवड्यात नवीन आयकर विधेयक आणले जाईल. या प्रत्यक्ष कर सुधारणांबद्दल आम्ही तुम्हाला नंतर सांगू, असंही सीतारमण यांनी सांगितले.पगारदार लोकांसाठी १२.७५ लाख रुपयांच्या उत्पन्नावर कोणताही कर लागणार नाही. नवीन कर स्लॅबची घोषणा करताना अर्थमंत्र्यांनी सांगितले की, यामुळे मध्यमवर्ग आणि देशाची अर्थव्यवस्था मजबूत होईल. आम्ही मध्यमवर्गीयांवरील कर कमी केले आहेत आणि मला हे सांगण्यास आनंद होत आहे की आता १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर लागणार नाही.



### शेतकऱ्यांना दिलं मोठं गिफ्ट

किसान क्रेडिट कार्डसाठी आता लिमिट वाढवण्यात आली आहे, कार्डवरती आता ५ लाखांपर्यंतचे लिमिट वाढवण्यात आले आहे. सध्या शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या क्रेडिट कार्डची एकूण मर्यादा तीन लाख रुपये आहे. आता ही मर्यादा वाढवून पाच लाख रुपये करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसापासून किसान क्रेडिट कार्डचे लिमिट वाढवण्यात आले नव्हते. अनेक दिवसापासून याबाबत मागणी करण्यात आली होती. आता याबाबत केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये निर्णय घेण्यात आला आहे.

### बदलानंतर कर स्लॅब मागे

० ते ४ लाखांपर्यंत - काहीही कर नाही

४ लाख ते ८ लाखांपर्यंत - ५ टक्के

८ लाख ते १२ लाख - १० टक्के

१२ लाख ते १६ लाख - १५ टक्के

१६ ते २० लाख - २० टक्के

२० लाख ते २४ लाख - २५ टक्के

२४ लाखांच्या वर - ३० टक्केला नंतर सांगू, असंही सीतारमण यांनी सांगितले.

### काय स्वस्त? काय महागणार?

चामड्याच्या वस्तू स्वस्त होणार

इलेक्ट्रॉनिक वस्तू स्वस्त होतील.

मोबाईल फोन आणि मोबाईलच्या बॅटरी स्वस्त होतील.

इलेक्ट्रिक कार स्वस्त होईल.

कपड्याच्या वस्तू स्वस्त होतील.

एलईडी टीव्हीही स्वस्त होईल.

कर्करोगावरील तब्बल ३६ औषधे पूर्णपणे करमुक्त करण्यात आली आहेत.

तर अनेक औषधांवरून कस्टम ड्युटी हटवली जाईल.

फ्रोझन फिश पेस्टवरील कस्टम ड्युटी १५ वरून ५

विणकरांनी विणलेले कपडे स्वस्त होतील.

सागरी उत्पादनांवरील कस्टम ड्युटी ३० वरून ५ टक्के करण्यात आली.

### काय महागलं?

फ्लॅट पॅनेल डिस्प्ले महाग होणार आहेत.

सोप्या भाषेत सांगायचं झालं तर इलेक्ट्रॉनिक्स किंवा स्मार्टफोन्स निर्मितीसाठी लागणारे घटक स्वस्त झाले आहेत. त्यामुळे भारतात तयार होणाऱ्या या वस्तू स्वस्त होतील. याचा थेट फायदा ग्राहकांना होणार आहे. म्हणजे आता भारतात तयार होणार आयफोन स्वस्त होऊ शकतो.

# कॅन्सर संबधी ३६ महत्वाची औषधे टॅक्स फ्री होणार

## अनेक औषधांवरील कस्टम ड्यूटी हटवली जाणार; बजेटमध्ये आरोग्य क्षेत्रासाठी काय काय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

मोदी सरकार ३.० चा पहिला पूर्णकालीन सर्वसाधारण अर्थसंकल्प आज सादर झाला. आज देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सलग आठव्यांदा अर्थसंकल्प सादर केला. खरे तर, स्वतंत्र भारतातील त्या सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या अर्थमंत्री ठरल्या आहेत. आज संसदेत अर्थसंकल्प सादर करताना सीतारमण यांनी ३६ महत्वाची औषधे पूर्णपणे टॅक्स फ्री करण्यासंदर्भात घोषणा केली आहे.




दुर्मिळ आजारांनी ग्रस्त लोकांसाठी आवश्यक औषधी पूर्णपणे कस्टम फ्री केली जाणार असल्याचे सीतारमण यांनीम म्हटले आहे. यासंदर्भात सविस्तर बोलताना अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, ३६ जीवनरक्षक औषधांवरील सीमाशुल्क पूर्णपणे रद्द केले जाईल. सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर तयार केले जातील. कॅन्सरच्या उपचारासाठी आवश्यक असलेली औषधी स्वस्त होतील. तसेच, ६ जीवनरक्षक औषधांवरील कस्टम ड्युटी ५% पर्यंत कमी केली जाईल.

### वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये १० हजार अतिरिक्त जागा वाढवल्या जाणार

याशिवाय, शिक्षणासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी एक चांगली संस्था निर्माण केली जाणार असल्याची घोषणा अर्थमंत्री सीतारमण यांनी केली आहे. तसेच वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये १० हजार अतिरिक्त जागा वाढवल्या जाणार आहेत. ५ वर्षांमध्ये ७५ हजार जागा वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. देशातील सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये डे केअर कॅन्सर सेंटर्स स्थापन केली जाणार आहेत. २०२५-२६ या वर्षात अशी २०० केंद्रे उभारण्याचे उद्दीष्ट असल्याची घोषणा सीतारामण यांनी केली.

### आरोग्य, कृषी आणि इनोव्हेशनमध्ये AIचा वापर

सीतारमण म्हणाल्या, बिहारमध्ये फूड टेक्नॉलॉजी, मॅनेजमेंट इन्स्टिट्युट सुरू केले जाणार आहे. याशिवाय देशात एआयच्या अभ्यासाठी तीन केंद्र उभारली जातील. आरोग्य, कृषी आणि इनोव्हेशनमध्ये एआयचा वापर करण्यात येणार आहे.

# अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी १० मोठ्या घोषणा

## या राज्यातील शेतकऱ्यांना सर्वाधिक फायदा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर करत आहेत. आपली अर्थव्यवस्था सर्व प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये वेगाने वाढणारी आहे. गेल्या १० वर्षातील देशाचा विकास पथ आणि संरचनात्मक सुधारणांनी जगाचे लक्ष वेधून घेतलं आहे. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना काय मिळणार हा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात आहे. अर्थमंत्र्यांसाठी शेती आणि शेतकऱ्यांसाठी १० मोठ्या घोषणा केल्या आहेत.




अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य योजना जाहीर केली आहे. सरकार ही योजना राज्यांसोबत चालवणार आहे. १.७ कोटी शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. याचा देशातील १०० जिल्ह्यांना फायदा होणार आहे.

भाजीपाला आणि फळांचे उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे. यासाठी राज्यांसोबत योजना आणणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ च्या भाषणात डाळींमध्ये 'आत्मनिर्भरता' साध्य करण्यासाठी ६ वर्षांच्या मिशनची घोषणा करण्यात आली आहे. पुढील ६ वर्षे मसूर आणि तूर या डाळींचे उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांवरील रासायनिक खतांच्या खर्चाचा भार कमी करण्यासाठी सरकारने मोठं पाऊल टाकलं आहे. या अंतर्गत आसाममध्ये युरियाचा नवा प्लांट सुरू होणार आहे.

सरकारने किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ५ लाख रुपये केली आहे. शेतकऱ्यांना स्वस्त व्याजदरात कर्ज दिले जाणार आहे. यासोबतच कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ५ लाख रुपयांचे पॅकेजही दिले जाणार आहे.

किसान क्रेडिट कार्ड ७.७ कोटी शेतकरी, मच्छीमार आणि दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना अल्प मुदतीची क्रेडिट सुविधा प्रदान करते. सुधारित व्याज सवलत योजनेंतर्गत, घउउ (किसान क्रेडिट कार्ड) द्वारे घेतलेल्या कर्जाची मर्यादा ३ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे.


कापूस उत्पादन वाढवण्यासाठी ५ वर्षाचे मिशन आखण्यात आले आहे. यामुळे देशातील कापड व्यवसाय मजबूत होईल. यासाठी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ५ लाख रुपयांचे पॅकेजही दिले जाणार आहे.

बिहारच्या शेतकऱ्यांसाठी एक मोठी घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. बिहारमध्ये मखाना बोर्ड स्थापन केले जाणार आहेय याचा फायदा लहान शेतकरी आणि व्यापाऱ्यांना होईल.

मच्छीमार आणि दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांसाठी सरकारने मोठी घोषणा केली आहे. व्यवसायासाठी सरकार ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज देण्यात येणार आहे.

धनधान्य योजनेंतर्गत नाफेड आणि एनसीसीएफ शेतकऱ्यांकडून डाळ खरेदी करणार आहेत. या योजनेतून शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्याची अपेक्षा आहे.

# १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा अर्थसंकल्प : पंतप्रधान मोदी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१नवी दिल्ली**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा आणि प्रत्येक भारतीयाचे स्वप्न पूर्ण करणारा आहे, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर दिली.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला शुक्रवारी सुरुवात झाली. मोदी सरकारच्या ऐतिहासिक तिसर्या कार्यकाळातील पहिला पूर्ण अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी शनिवारी मांडला. संसदेत अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी माध्यमांना संबोधित केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा जनतेचा अर्थसंकल्प आहे. भारताच्या विकासामध्ये आजचा दिवस एक महत्त्वाचा टप्पा आहे. १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा हा अर्थसंकल्प आहे. प्रत्येक भारतीयाची स्वप्ने पूर्ण करणारे बजेट आहे. तरुणांसाठी अनेक क्षेत्रे खुली केली आहेत. हे विकसित भारताच्या ध्येयाला चालना देणारे एक शक्ती गुणक बजेट आहे. आजच्या अर्थसंकल्पाने भारतात गुंतवणुकीला, पर्यटनाला चालना मिळेल. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी झालेल्या घोषणा कृषी क्षेत्र आणि ग्रामीण भागात क्रांती घडवेल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

# स्वप्नवत अर्थसंकल्प; मुख्यमंत्री फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसीत भारताचा आहे. भारताला गतीने पुढे नेणारा आणि प्रगल्भ अर्थव्यवस्थेकडे चाललेला हा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प भारताच्या इतिहासात मैलाचा दगड ठरेल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर दिली.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला शुक्रवारी सुरुवात झाली. मोदी सरकारच्या ऐतिहासिक तिसर्या कार्यकाळातील पहिला पूर्ण अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी मांडला. संसदेत अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी एक उत्तम अर्थसंकल्प सादर केला आहे. हा एक स्वप्नवत अर्थसंकल्प म्हणता येईल, विशेषतः मध्यमवर्गासाठी. आयकर सवलत १२ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. ही घोषणा भारताच्या अर्थव्यवस्थेत एक मैलाचा दगड ठरेल. यामुळे मोठ्या प्रमाणात लोकांच्या हातात खर्च करण्यायोग्य उत्पन्न येईल. यामुळे खरेदी होईल, मागणी वाढेल आणि एमएसएमईला फायदा होईल. रोजगार निर्माण होईल. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम दिसून येईल. १०० जिल्ह्यात शेती विकासाच्या योजना असतील किंवा तेलबियांच्या संदर्भातील घोषणांमुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी फायदा होईल. शेती क्षेत्रामध्ये विविध प्रकारची गुंतवणुक सरकारने घोषित केली आहे. एमएसएमईच्या क्षेत्राला फायदा होणार आहे. हे सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र असल्याने त्याचा तरूणांना फायदा होणार असल्याचा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.



# 'लक्ष्मीच्या पाऊलखुणा उमटल्या' - एकनाथ शिंदेंची ३ शब्दांत प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मुंबई**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी २०२५-२६ चा केंद्रीय अर्थसंकल्प आज (दि.१) लोकसभेत सादर केला. त्यांनी सलग आठवा विक्रमी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पावर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एक्सवर पोस्ट करून प्रतिक्रिया दिली आहे.

शिंदे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचे पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात येणार, याची खात्री देणारा केंद्र सरकारचा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पात सामान्य नोकरदार वर्गाला जो दिलासा मिळाला आहे. त्याचे वर्णन अभूतपूर्व असंच करावं लागेल. १२ लाखापर्यंतच्या उत्पन्नावर संपूर्ण करमुक्ती मिळाल्याने आता घराघरात लक्ष्मीची पावलं उमटल्याशिवाय राहणार नाहीत. एक सर्वांगसुंदर, आत्मनिर्भर भारताला सबळ करणारा हा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन करतो, आणि महाराष्ट्रातील तमाम नोकरदारांतर्फे त्यांचे आभारही मानतो.शिक्षण, आरोग्य आणि कृषी या तिन्ही महत्त्वाच्या क्षेत्रांना अर्थसंकल्पातील कल्पक तरतुदींचा लाभ होणार असल्याने देशाच्या प्रगतीचा आलेख अधिकाधिक उंचावत जाणार यात शंकाच नाही. हा सशक्त भारताचा रोडमॅप आहे. दुरवस्था संपवून पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्त्वात आपला भारत देश सुबत्तेच्या दिशेने वाटचाल करु लागल्याची ही शुभचिन्हे आहेत.



## संपादकीय ......

# अर्थव्यवस्थेला गती देण्याची सुवर्णसंधी

*मोदी सरकारच्या ऐतिहासिक तिसर्या कार्यकाळातील आगामी अर्थसंकल्प हा पहिला पूर्ण अर्थसंकल्प असल्याने सर्वसमावेशक विकास, रोजगारनिर्मिती आणि दीर्घकालीन स्थैर्य यावर भर देताना तत्काळ समस्यांवर उपाय शोधणे अत्यावश्यक आहे. आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन केंद्रीय अर्थसंकल्प सादर करत आहेत, त्यानिमित्ताने...*

*केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ हा महागाई, बेरोजगारी आणि मंदीने ग्रासलेल्या जागतिक परिस्थितीत भारताच्या अर्थव्यवस्थेला गती देण्याची सुवर्णसंधी आहे. अनेक देश युद्धजन्य परिस्थिती आणि दहशतवादी कारवायांमुळे आर्थिकदृष्ट्या पंगू झाले आहेत. या अर्थसंकल्पाद्वारे भारताच्या आर्थिक स्थैर्याला बळकटी देणार्या बदलांचे आश्वासन आहे. भारत स्थैर्याचा दीपस्तंभ म्हणून उभा असल्याने या अर्थसंकल्पात महत्त्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. घरगुती मागणी वाढवणे, जागतिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि भारताला उत्पादन व नावीन्याचे केंद्र बनवण्यासाठी हा अर्थसंकल्प हे एक व्यासपीठ आहे. अर्थसंकल्प फक्त तत्कालिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी नसून भारताच्या आर्थिक नेतृत्वासाठी पुढील अनेक दशकांचे दूरदर्शी राजमार्ग आखणे आवश्यक आहे.*

*केंद्रीय अर्थसंकल्प हा देशाच्या आर्थिक धोरणांचा आरसा असतो. यात वापरण्यात येणार्या तांत्रिक संज्ञा आणि शब्दावली सामान्य नागरिकांसाठी कधी कधी गुंतागुंतीच्या वाटू शकतात. अर्थसंकल्प समजण्यासाठी आणि त्याचा आपल्या जीवनावर होणारा परिणाम ओळखण्यासाठी या संज्ञांची योग्य ओळख होणे आवश्यक आहे. यातील सर्वांत महत्त्वाचा शब्द असतो तो जीडीपी म्हणजे सकल देशांतर्गत उत्पन्न. याचा अर्थ विशिष्ट कालावधीत देशात उत्पादित सर्व वस्तू आणि सेवांची एकूण आर्थिक किंमत. जीएनपी म्हणजे सकल राष्ट्रीय उत्पादन, ज्यामध्ये परदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न समाविष्ट असते. फिस्कल डेफिसिट म्हणजे राजकोषीय तूट म्हणजे सरकारच्या एकूण खर्च आणि उत्पन्न यातील तूट (उधारी वगळून). सरकारी महसुलाने नियमित खर्च भागविण्यात येणारी कमतरता म्हणजे महसूल तूट अर्थात रेव्हेन्यू डेफिसिट. देशाच्या आयातीचा खर्च निर्यातीतून मिळणार्या उत्पन्नापेक्षा अधिक असतो तेव्हा निर्माण होणार्या तुटीला चालू खाते तूट म्हणजेच करंट अकाऊंट डेफिसिट म्हणतात. यासह अन्य शब्दावली सर्वसामान्यांनी समजून घेतल्या पाहिजेत, जेणेकरून आपल्या देशाचा अर्थसंकल्प नेमका कसा आहे, याचे आकलन होण्यास मदत होऊ शकते.पायाभूत सुविधा भारताच्या विकासकहाणीचा कणा आहेत. वाहतूक जाळे, लॉजिस्टिक हब आणि डिजिटल पायाभूत सुविधा यामध्ये गुंतवणूक केल्यास रोजगार निर्माण होईल आणि भारत जागतिक गुंतवणूकदारांसाठी आकर्षण ठरेल. बंदरे आणि विमानतळ मानव आणि साहित्य यांच्या जलद व कार्यक्षम वाहतुकीसाठी विकसित होणे आवश्यक आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी आणि पायाभूत सुविधांच्या बाँडवर कर सवलतीद्वारे अतिरिक्त संसाधने उपलब्ध होऊ शकतात.बेरोजगारीला हाताळणे महत्त्वाचे आहे. हरित ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि रोबोटिक्स यासारख्या भविष्यकालीन क्षेत्रांमध्ये कौशल्य विकासासाठी निधी प्रदान केल्याने श्रमिकवर्ग उद्योगांच्या बदलत्या गरजांसाठी तयार होईल. उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील मजूरकेंद्रित प्रोत्साहनांद्वारे रोजगार निर्माण होऊ शकेल. पायाभूत सुविधा प्रकल्प श्रमप्रधान असतात आणि त्याद्वारे मालमत्ता तयार होत असताना भविष्यातील प्रगतीसाठी वाट मोकळी होते.आर्थिक सुधारणा केंद्रस्थानी असताना कर सुधारणा पूरक भूमिका बजावतील. जीएसटी आणि आयकर प्रक्रियांची गुंतागुंत कमी करणे, ज्यामुळे अनुपालनाचा बोजा कमी होईल आणि करदात्यांचा आत्मविश्वास वाढेल. कलम ८० सी आणि ८० डीअंतर्गत वजावट वाढवून मध्यमवर्गीयांना दिलासा देणे, ज्यामुळे त्यांच्याकडे अधिक खर्च करण्यायोग्य उत्पन्न शिल्लक राहील. स्टार्टअप्स, एमएसएमई आणि हरित ऊर्जा प्रकल्पांसाठी लक्ष्यित कर प्रोत्साहने प्रदान करणे, जे नावीन्य व शाश्वततेला चालना देतील. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ भारतासाठी जागतिक आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येण्यासाठी एक सुवर्णसंधी आहे.ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी उद्दिष्टपूर्ण उपाययोजना गरजेच्या आहेत. सिंचनासाठी अनुदाने वाढवणे, कृषी तंत्रज्ञान स्टार्टअप्सना प्रोत्साहन देणे आणि शेतकर्यांना बाजारपेठेपर्यंत सहज पोहोचता येणे यामुळे कृषी उत्पादन क्षमता व ग्रामीण उत्पन्न वाढेल. कृषी व्यवसाय आणि साठवण सुविधा यांना कर सवलती दिल्यास गती मिळेल.जग पुनर्नवीकरणीय ऊर्जेकडे वाटचाल करत असताना भारताने आघाडी घेणे आवश्यक आहे. सौर, वारा आणि हायड्रोजन ऊर्जा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिल्यास देशाच्या ऊर्जेची गरज भागेल आणि शाश्वततेच्या दिशेने भारताचे नेतृत्व सिद्ध होईल. कार्बन क्रेडिट कमावण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न आणि जनजागृती केली पाहिजे.महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि ग्राहक मागणी वाढवण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. आवश्यक वस्तूंवरील दर कमी करणे आणि गरजू घटकांसाठी उद्दिष्ट अनुदान प्रदान केल्याने किंमती स्थिर होतील. थेट कर सवलतींद्वारे ग्राहकांच्या खरेदी क्षमतेला चालना दिल्यास आर्थिक क्रियाशीलता वाढू शकेल.*

# आयआयएमसीत अत्याधुनिक टीव्ही स्टुडिओचा शुभारंभ

## कुलगुरू आणि कुलसचिव यांनी केले उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती-** भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) मध्ये विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक टेलिव्हिजन स्टुडिओ सुरू करण्यात आला असून त्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. अनुपमा भटनागर आणि कुलसचिव डॉ. निमिश रुस्तगी यांच्या ऑनलाइन उपस्थितीत विद्यार्थ्यांन द्वारा फिता कापून करण्यात आले.भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) सम विश्वविद्यालयाच्या अमरावती स्थित पश्चिम क्षेत्रीय परिसरात दिनांक ३१ जानेवारी रोजी सकाळी ११:३० वाजता अत्याधुनिक टेलिव्हिजन स्टुडिओ चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी कॅमेरा हाताळून आणि टेलीप्रॉम्प्टरच्या मदतीने स्विचरचा वापर करीत बातम्यांचे अँकरिंग करून स्टुडिओ ची कार्यप्रणाली दाखविली. याप्रसंगी प्रादेशिक संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांच्या सह प्रसारण तंत्र प्रशिक्षक रमेश चंद्रा, डॉ. आदित्य कुमार मिश्रा, चैतन्य पाटील, जयंत सोनोने, निकिता वाघ उपस्थित होते.विद्यार्थ्यांना दूरचित्रवाणी पत्रकारितेचे प्रत्याक्षिक उत्तम पद्धतीने करता यावे यासाठी आयआयएमसीत हा स्टुडिओ उभारण्यात आला आहे. यात कॅमेरा, टेलीप्रॉम्प्टर, दृक श्राव्य स्विचर, क्रोमा, प्रकाश व्यवस्था, संपादन संबंधी सॉफ्टवेअर आदि अत्याधुनिक सामग्री आहे. यावेळी कुलगुरू डॉ. भटनागर यांनी स्टुडिओच्या निर्माणाबद्दल आनंद व्यक्त केला आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या नव्याने



बांधलेल्या टीव्ही स्टुडिओचा पुरेपूर वापर करून टेलिव्हिजन पत्रकारितेत प्रावीण्य मिळवण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कुलसचिव डॉ. रुस्तगी म्हणाले की, अमरावती कॅम्पसच्या गरजेनुसार सर्व प्रकारची संसाधने विद्यार्थ्यांन साठी उपलब्ध करून दिली जातील. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अधिकाधिक या सुविधांचा लाभ घ्यावा आणि या क्षेत्रात पुढे जावे. प्रादेशिक संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांनी आपल्या भाषणात अमरावती कॅम्पसमध्ये अत्याधुनिक टीव्ही स्टुडिओची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल कुलगुरू, कुलसचिव आणि आयआयएमसी अधिकाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आदित्य कुमार मिश्रा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश झोलेकर, संजय पाखोडे, नुरुज़्ज़मा शेख , भूषण मोहोकर, राजेश कुमार, अनंत नांदुरकर, मंदा पवार, नंदा तुप्पट इत्यादींनी विशेष सहकार्य केले. यावेळी मराठी, हिंदी आणि इंग्रजी पत्रकारिता अभ्यासक्रमांचे विद्यार्थी उपस्थित होते.




## हातांमध्ये वेदना होण्याची कारणे कोणती?

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

डोकेदुखी, पाठदुखी, पायदुखी, कंबरदुखी, पोटात दुखणे, छातीत दुखणे यांबरोबरच दिवसभर सदैव काम करणारे हातही काही वेळा दुखू लागतात; पण बहुतेकदा आपण त्याकडे लक्ष देत नाही. तसे पाहता हातांमधील वेदना ही एक सामान्य समस्या आहे; पण या वेदना सतत जाणवत असतील, तर त्याचा आपल्या दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ शकतो.



हातांमधील वेदना होण्याची कारणे

कार्पल टनल सिंड्रोम : यामध्ये हाताच्या तळाशी असलेल्या कार्पल टनलवर दबाव येतो. यामुळे हाताच्या बोटांमध्ये सुन्नपणा जाणवणे, झिणझिण्या येणे यांसह वेदना होऊ शकतात. सतत संगणकाचा वापर करणे, ओझी उचलणे यासारख्या गोष्टी दीर्घकाळ आणि नियमित करत राहिल्याने ही समस्या उद्भवू शकते. आर्थरायटिसमुळेही हाताच्या सांध्यांमध्ये सूज येऊन आणि वेदना होतात. याचे दोन प्रमुख प्रकार आहेत. ऑस्टियोआर्थरायटिस आणि र्हुमेटाईड आर्थरायटिस. याखेरीज टेंडोनाइटिस हा एक स्नायू तंतूंचा विकार आहे, जो हात किंवा कोपरांच्या जॉईंटस्मध्ये होऊ शकतो. गाऊट म्हणजे शरीरात युरिक ॲसिड जमा होणे. या व्याधीतही हातांमध्ये तीव्र वेदना आणि सूज होऊ शकते. हातातील नसांवर दबाव येण्यामुळे सुन्नपणा जाणवू शकतो. तसेच वेदनाही होऊ शकतात. याला नर्व कॉम्प्रेशन किंवा नर्व इन्फ्लेमेशन म्हणतात.हातांच्या वेदना टाळायच्या असतील, तर सर्वप्रथम हातांवर जास्त ताण येईल असे काम करणे टाळायलाहवे. याखेरीज सुरुवातीच्या टप्प्यात बर्फाने शेक दिल्यास वेदनांमध्ये आराम मिळतो. हलक्या स्ट्रेचिंग व्यायामाने हातांचे स्नायू आणि सांधे लवचिक ठेवता येतात. तसेच या व्यायामामुळे रक्ताभिसरण सुधारते. हातांमध्ये होणार्या वेदना दीर्घकाळ टिकून राहिल्यास किंवा तीव्र झाल्यास तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या. औषधे, फिजिओथेरपी किंवा इतर उपचारांचे पर्याय डॉक्टर सुचवू शकतात. आर्थरायटिस किंवा इन्फ्लेमेटरी स्थितीसाठी डॉक्टर वेदनाशामक किंवा अँटिइन्फ्लेमेटरी औषधे सुचवू शकतात. काही वेळा हीटिंग पॅडस्चा वापर करून हातांमधील स्नायूंना आराम देता येतो.

# वेलवर्गीय भाजीपाला पिकांचे खत व्यवस्थापन कसे कराल? जाणून घ्या सविस्तर

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

वेलवर्गीय भाजीपाला पिकांचे योग्य आणि दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी लागवडीपासूनचे व्यवस्थापन करणे गरजेचे असते. यासाठी पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन इत्यादी तांत्रिक बाबी विचारात घेऊन सुयोग्य नियोजन अपेक्षित असते. या लेखातून वेलवर्गीय पिकास खतांचे योग्य व्यवस्थापनकसे करावे हे जाणून घेणार आहोत...

**खत व्यवस्थापन** - वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये माती परीक्षण करून संतुलित प्रमाणात खते वापरावीत.

दोडका, कलिंगड, खरबूज पिकाला प्रति एकरी ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद व २० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा आवश्यक आहे. यापैकी अर्धे नत्र (२० किलो), संपूर्ण स्फुरद (२० किलो) व संपूर्ण पालाश (२० किलो) लागवडीवेळी द्यावे.

नत्राची उर्वरित अर्धी मात्रा (२० किलो) लागवडीनंतर ३०, ४५ व ६० दिवसांनी तीन समान हप्त्यांत विभागून बांगडी पद्धतीने रोपांच्या बुंध्यापासून थोड्या अंतरावर मुळांच्या क्षेत्रात द्यावी.

**खते दिल्यानंतर ताबडतोब पाणी द्यावे.**

काकडी, दुधी भोपळा, कारले पिकाला प्रति एकरी ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद व २० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा आवश्यक आहे. यापैकी अर्धे नत्र (२० किलो), संपूर्ण स्फुरद (२० किलो) व संपूर्ण पालाश (२० किलो) लागवडीवेळी द्यावे.

नत्राची उर्वरित अर्धी मात्रा (२० किलो) लागवडीनंतर ३० व ४५ दिवसांनी दोन समान हप्त्यांत विभागून बांगडी पद्धतीने रोपांच्या बुंध्यापासून थोड्या अंतरावर मुळांच्या क्षेत्रात द्यावी. खते दिल्यानंतर ताबडतोब पाणी द्यावे.




सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असणाऱ्या जमिनीसाठी, आवश्यकतेनुसार लागवडीवेळी एकरी १० किलो फेरस सल्फेट, ८ किलो झिंक सल्फेट, ४ किलो मॅगनीज सल्फेट व २ किलो बोरॅक्स शेणखताबरोबर अथवा निंबोळी पेंडीसोबत मिसळून द्यावे.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी







### आ. रवी राणा यांचे मागणीवर पालकमंत्री सकारात्मक

# मनपा शाळा डिजिटलसाठी १६ कोटी रूपये मंजुर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** १४जिल्हा नियोजन वार्षिक बैठकीत अध्यक्ष ना. बावनकुळे यांचे समक्ष नामदार रवी राणा यांनी ज्वलंत वषय, समस्या सोडविणे संबंधाने ठक मध्ये मांडले. यावेळी आमदार बी राणा हे यावेळी आक्रमक झाले ते. पालकमंत्री यांनी दखल घेत पाशाळाडिजिटलसाठी १६ कोटी नये मंजुर केले. तसेच मनपा रतीच्या नवीन बिल्डिगचा काखडा प्रस्ताव तयार करण्याचेपालकमंत्र्यांनी सुचित केले.

भिवापूर तलाव काम कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर दिरंगाई कारवाई करण्याचा इशारा यावेळी दिला. पेढी प्रकल्प अंतर्गत एकूण सातगावांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. यासंबंधाने कामचुकार कथले. का अ. व अधीक्षक अभियंता आक्केववार यांचेवर कारवाई करण्याचे निर्देश पालकमंत्री ना. बावनकुळे यांचे जिल्हा नियोजन बैठकीत दिले. मेळघाट क्षेत्र अंतर्गत २२ गावे अजूनहीअजूनही अंधारात आहेत त्या ठिकाणी वीज जोडणी झाली नाही. तेथील गावांना वीज जोडणी करण्यासाठी एकूण ५४ कोटी रूपये देण्याचा णड प्रस्ताव शासनाला पाठवण्यात येईल. यासंदर्भात आ. रवी राणा

## मेळघाटातील वीज जोडणीसाठी ५४ कोटी रुपये पेढी प्रकलप अंतर्गत एकूण सात गावांचे पुनर्वसन



सोबतूच आ. केवलराम काळे यांनी पालकमंत्र्यांकडे मागणी केली. त्यावर त्वरीत ॲक्शन घेत प्रधान सचिव, संचालक यांचे सोबत बोलून वरील काम मंजुर करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी बैठकीतच दिले.-

# महानगर पालिकेच्या वतीने ३६९ आशा स्वय:सेविकाचे माता व बालसंगोपन, लसीकरण प्रशिक्षण समारोप संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** - सार्वजनिक आरोग्य विभाग म.न.पा अमरावती अंतर्गत १३ शहरी आरोग्य केंद्राच्या आशा स्वयंसेविका यांचे क्ष्छउ व क्ष्धउ या कार्यक्रमाचे प्रशिक्षण संपन्न झाले असून डॉ विशाल काळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी तात्काळ हा कार्यक्रम राबवण्याच्या सूचना दिल्या तसेच हा कार्यक्रम म्हणजे नवजात शिशुची ,लहान बाळा ची घरच्या घरी घ्यावयाची काळजी हे महत्वाचे समुपदेशन आशा स्वयंसेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांना देणार आहे समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ विशाल काळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी आशा यांना मार्गदर्शन केले आपल्या कार्यक्षेत्रात गरोदर माता यांची परिपूर्ण काळजी घेणे व एकही बाळ लसीकरण पासून सुटायला नको असे सांगितले डॉ रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी यांनी सांगितले की गरोदर माता यांना वेलो वेळी मार्गदर्शन करून आरोग्य विषयक माहिती देण्यात यावी व आशा स्वयंसेविका यांना प्रशिक्षित करणारे प्रशिक्षक डॉ.



स्वाती कोवे माता व बालसंगोपन अधिकारी ,डॉ. पौर्णिमा उघडे वैद्यकीय अधिकारी ,डॉ.मानसी मुरके (काबरा)वैद्यकीय अधिकारी ,डॉ.अलमास जौफशा खान वैद्यकीय अधिकारी , विलास नकाशे पिएचएन, रुपम खांडेझोड अकांऊटन ,वैशाली सुरोशे आरोग्य सेविका ,निकिता बडवाईक गट प्रवर्तिका उपस्थित होते.डॉ मानसी मुरके यांनी प्रास्ताविक केले तर डॉ स्वाती कोवे यांनी बालसंगोपन व लसीकरण बाबत प्रशिक्षण दिले आशा गटप्रवर्तक श्री. रुपम खंडेझोड यांनी या कार्यक्रमाचे स्वरूप तसेच आशा यांना मोलाचे मार्गदर्शन करून प्रशिक्षित केले व त्वरित कार्यक्रम राबविण्याच्या सूचना आशा स्वयंसेविका यांना दिल्या.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५

शहर/ग्रामिण




# पारदर्शी, गतीमान प्रशासनाचा संकल्प करा -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे





## शिक्षण, आरोग्यावर प्राधान्याने निधी देणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती–** जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर ना. चंद्रशेखर बावनकुळेयांनी प्रथमच डीपीसी बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी मेळघाट ते धामणगाव रेल्वेपर्यंतच्या जिल्ह्यातील विविध प्रश्नावर चर्चा करून जिल्ह्याच्या गतीमान विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही देत प्रशासनला चांगलेच धारेवर धरले. विशेष म्हणजे काही लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईबाबत भूमिका मांडल्यानंतर पालकमंत्री ना. बावनकुळे चांगलेच आक्रमक झाले. जिल्ह्याच्या विकासासाठी शाश्वत विकासाचे ध्येय, जिल्ह्याचा संकल्प आणि पायाभूत सुविधांवर भर दिला जाईल. यासाठी सर्वांनी गतीमान, पारदर्शी शासनाचा संकल्प करावा, असे आवाहन बलकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

या बैठकीत जिल्ह्याच्या विकासाला चालना देणारेअनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीत विविध विकासकामांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली, तसेच नाविण्यपूर्ण प्रकल्पांवरही चर्चा झाली. तसेच जिल्हा नियोजनचा निधी वेळेत खर्च

होण्यासाठी सात दिवसांच्या आत प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

खा. बळवंत वानखडे, आ. किरणसरनाईक, आ. सुलभा खोडके, आ. रवी राणा, आ.प्रवीण तायडे, आ. उमेश उर्फ चंदू यावलकर, आ. राजेश वानखडे, आ. केवलराम काळे, आ. गजानन लवटे, प्रवीण पोटे पाटील, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, धारणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत मस्के आदी यावेळी उपस्थित होते. बैठकीत प्रास्ताविकेत जिल्हाधिकारी कटियार यांनीजिल्ह्यात सुरु असलेल्या कामांची माहितीदिली.

**सचिव – मंत्र्यांना थेट मोबाईवरून सूचना**

लोकप्रतिनिधींच्या प्रस्तावाला उत्तर नदेणे, वेळेतनियोजनन करणे, सभागृहात व्यवस्थीत माहिती सादर न करणे, आर्थिक वर्ष संपायला दोन महीने शिल्लक असताना निधी बुक न करणे यावर पालकमंत्र्यांचे जिल्हाधिकाऱ्यांसह विविध विभागांच्या खाते प्रमुखांवर चांगलेच ताशेरे ओढले. त्यांच्या कार्यक्षमतेवर पालकमंत्र्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करितया अधिकाऱ्यांच्या सीआरमध्ये त्याची नोंदघ्या, अशा सूचना संबंधित विभागांचे सचिव, मंत्र्यांना थेट दुरध्वनीवरून संपर्क करुन दिल्या. सभागृहातील या तातडीच्या कारवाईने अधिकऱ्यांची चांगलीच भांबेरी उडाली.

**....तर मी कारवाई करणार**

त्यामुळे संबधित अधिकाऱ्यांना त्यामुळे संबधित अधिकाऱ्यांना पालकमंत्र्यांना विचारणा केली असता, त्याचे स्पष्टीकरण देखील अधिकाराने सभागृहात दिले, परंतु हेच स्पष्टीकरण खासदारांना का दिले नाही. असा प्रतिप्रश्न करित पालकमंत्र्यांनी संबधित अधिकाऱ्यांना साविले, यानंतर कोणत्याही लोकप्रविनिधीया अर्जाची दखल घेऊन त्याच समाधान करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची राहील, सदरचा विषय माझ्याकडे आल्यास त्यांच्यावर मी कारवाई करेल असा दम पालकमंत्यांनी यावेळी दिला. आ. रवी राणा यांच्या तक्रारीवरून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची चांगलीच खरडपट्टी काढली. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी नियोजनाचे सादरीकरण केले.

**विविध विकासकामांसाठी भरीव तरतुद–** वार्षिक नियोजन समितीच्या बैठकीमध्ये विविध विकासकामांना चालना देण्यासाठी भरीव तरतुद करण्यात आली. ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी २१.४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यातून ८३ कामे पूर्ण होणार असून ४०.३१ किलोमीटर लांबीचे रस्ते तयार होतील. इतर जिल्हा मार्गासाठी १४.१४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. ज्यामुळे २८ किलोमीटर रस्त्यांची सुधारणा होईल. जिल्ह्यातील १४ नगरपालिका, नगरपंचायती आणि महानगरपालिकेच्या विकासासाठी ११.८३ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्युतविकासासाठी ३० कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील ऊर्जा उपलब्धता सुनिश्चित होईल. प्राथमिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांसाठी निधी प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**अर्थसंकल्पावरही बैठकीत चर्चा**

यावेळी पुढील वर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या अर्थसंकल्पावरही बैठकीत चर्चा झाली. जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारणसाठी ४१७.७८ कोटी रुपये, अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी १०२ कोटी रुपये, तर आदिवासी उपयोजना घटक कार्यक्रमासाठी ११७.३८ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. सर्व कामे वेळेत आणि उच्च दर्जाची पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासकीय यंत्रणांना देण्यात आले आहेत.

### सूचनांचे पालन करण्याचे निर्देश

आमदारांच्या सूचनांचे शब्दशा प्रोसेडिगमध्ये घेण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. ज्याविभागांनी अद्यापही नियोजनातील पैसे बुक केले नाही, त्या विभाग प्रमुखांना पालकमंत्र्यांनी चांगलेच धारेवर धरले. अशा लेटलतिफ खातेप्रमुखांची तक्रार त्यांनी त्या त्या विभागांच्या प्रधान सचिवांकडे थेट दुरध्वनीवरून केली. तसेच त्यांच्या सीआरमध्ये नोंद घेण्याची देखील शिफारस पालकमंत्र्यांनी यावेळी केली.

### नागपूरच्या धर्तीवर अमरावतीचा विकास

आता पालकमंत्री बदलले आहे, असा हलगर्जीपणा मला चालणार नाही, नागपुरच्या धर्तीवर अमरावतीचा विकास करायचा आहे, त्यामुळे कोणत्याही विभाग प्रमुखांनी अनियमितता, अकार्यक्षमता दाखविल्यास तेथे निलंबन करेल असा दम त्यांनी यावेळी दिला. यंदा जानेवारीपर्यंत प्रशासकीय आदेशदेण्याचेकाम सुरू असल्याने पालकमंत्र्यांनीसंताप व्यक्त केला. रखडलेल्यानियोजनाच्या कामांना सातदिवसांचा अल्टीमेटमदिला. अन्यथा पैसे परतकरा, परंतुयाचीदेखील जबाबदारी निश्चित करूनकारवाई केली जाईल. पुढील आर्थिक वर्षाचे नियोजनाची संपुर्ण प्रक्रिया ही ३० जुनपर्यंत होणे गरजेचे आहे. कोणत्याही नियोजनाला ३० जुन नंतर मान्यता मिळणार नाही. अशा दम पालकमंत्र्यांनी यावेळी सर्व विभागांना दिला.

# चंद्रशेखर बावनकुळे यांनी समाजोपयोगी कार्यासाठी केला मुकुट अर्पण !

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.१अमरावती**



महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीला घवघवीत यश प्राप्त झाले आणि ऐतिहासिक विजय मिळवून दिल्याबद्दल भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे आज सकाळी भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांनी सोनेरी मुकुट देऊन स्वागत केले होते. मात्र भाजपाला मिळालेला विजय हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या निष्ठापूर्वक परिश्रमातून मिळाला असल्याने आपण हा सोनेरी मुकुट भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्ह्याच्या कार्यकर्त्यांना भेट म्हणून देत आहोत असे स्पष्ट करून चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी मुकुट शहर भाजपाच्या स्वाधीन केला. या मुकुटातून येणाऱ्या आर्थिक रक्कमेतून समाजोपयोगी उपक्रमात ही रक्कम खर्च करावी असे चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी अमरावती भाजपाच्या कार्यालयात शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत स्पष्ट केले. भाजपाच्या प्रदेशाध्यक्षांनी आपल्या पार्टीच्या कार्यकर्त्यांचा केलेला हा गौरव सामान्य कार्यकर्त्यांना सुखावून गेला आणि चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून एक आगळावेगळा आदर्श सर्व कार्यकर्त्यांच्या समक्ष प्रस्तुत केला.

# वल्लभ भुवन सह तीन दुकाने जळून खाक , कोट्यवधींचे नुकसान

## सरोज चौक,जवाहर रोडवर भीषण अग्नितांडव




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** स्थानिक जस्तंभ चौक ते जवाहर गेट मुख्य रस्त्यावरील वल्लभ भुवन मिठाई प्रतिष्ठानच्या वरच्या माळ्याला शुक्रवारी सायंकाळी ८वाजता भिषण आग लागली. या आगीने लगतच्या इलेक्ट्रिक प्रतिष्ठानलासुद्धा लपेटच्यात घेतले. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली.

वल्लभ भुवन मिठाईच्या प्रतिष्ठानमधून आगीचा डोंब सायंकाळी अचानक उसळला आणि । बघणाऱ्याची गर्दी प्रतिष्ठानच्याकडे वळली. या आगीने आजूबाजूचे संस्कृती सोबतच केंब्रिज यासह अन्य दोन ते तीन दुकाने कवेत घेतली. आगीच्या ज्वाळांनी वल्लभ भुवन मिठाई या प्रतिष्ठानचा वरच्या माळ्यावरील भाग पूर्णपणे बेचिराखझाला. बाजूचे इलेक्ट्रिकल दुकानाने देखील पेट घेतला. ही आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाचे सहा बंब घटनास्थळी दाखल झाले होते.या घटनेमध्ये एक इसम किरकोळ भाजल्याने त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. या घटनेमुळे आजूबाजूची दुकाने त्वरित बंद करण्यात आलीत. मुख्य तीन दुकाने आगीच्या कवेत आल्याने काही प्रतिष्ठाने कापड तसेच फॅशन बूट शूजची होती. त्या व्यापारी वर्गासह ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आग कशाने लागली, याची चर्चा बघ्यांमध्ये चर्चेचा विषय होती. आगीवर नियंत्रण मिळवण्याकरिता अग्निशामक दल पूर्णपणे धावपळ करीत होते.

### सर्व अधिकारी घटनास्थळी

आगीची माहिती मिळताच मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय आयुक्त भूषण पुसकतर, कार्यशाळा अधिक्षक – लक्ष्मण पावडे, अग्निशामक अधीक्षक संतोष – केंद्रे, नायब तहसीलदार टिना चव्हाण, मंडळ – अधिकारी सरिता मांजरे, तलाठी इक्बाल शेख, कोतवाल प्रशांत उके, डीसीपी गणेश शिंदे, कोतवाली पीआय मनोहर कोटनाके, एसीपी जयदत्त भंवर, यांच्यासह पोलिस यंत्रणा या ठिकाणी दाखल झाली होती. आगीचे स्वरुप पाहता परीसरातील आजुबाजुच्या दुकानदार, व्यापाऱ्यांनी सुद्धा आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी मदत केली.–

# पोलीस कुटुंबीयांच्या समस्यांची दखल घेऊन मार्गी लावू -राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १ अमरावती**



गृहराज्यमंत्र्यांचा पोलीस कुटुंबीयांशी संवादअमरावती,पोलीस कुटुंबीयांशी संवाद कार्यक्रमात मांडण्यात आलेल्या समस्या लेखी स्वरुपात घेऊन त्या मार्गी लावण्यासाठी पूर्ण प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन गृह ग्रामीण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.पोलीस मुख्यालयात आज डॉ. भोयर यांनी पोलीस कुटुंबीयांशी संवाद साधला. यावेळी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सागर पाटील, कल्पना बारवरकर आदी उपस्थित होते.राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी, पोलीस कुटुंबीयांच्या समस्या जाणून घेण्यासाठी हा संवाद कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. यामध्ये पोलिसांनी त्यांचे कुटुंबीय यांना होत असलेल्या समस्यांबाबत माहिती घेण्यात येत आहे. संवादामधून अनेक नवीन मुद्दे समोर येत आहेत. प्रामुख्याने पोलिसांच्या निवासस्थानाची समस्या समोर येत आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये शासनाच्या प्रयत्नाने मोठ्या प्रमाणात निवासस्थानी बांधण्यात येत आहेत. याबाबत राज्यस्तरावर समिती सहकार्य करीत आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी स्वातंत्र्यपूर्व काळातील पोलीस ठाणे आणि निवास व्यवस्था आहे. या ठिकाणी आवश्यक ती तरतूद करून समस्या मार्गी लागण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.पोलीस कुटुंबीय कायम दुसऱ्याच्या संरक्षणासाठी तयार असतात. मात्र पोलीस कर्तव्यावर असताना त्यांचे कुटुंब सुरक्षित राहील, यासाठीही प्रयत्न करण्यात येतील. आज संवादामध्ये मांडलेल्या विविध मुद्द्यांवर दखल घेण्यात येईल. या सर्व समस्या पोलीस प्रशासनाकडून लेखी स्वरुपात मागविण्यात येऊन त्या लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.पोलीस आयुक्त श्री. रेड्डी यांनी निवासस्थानाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी नवीन बांधकामे हाती घेण्यात आली आहे. तसेच पोलीस कुटुंबीयांशी सातत्याने संवाद साधण्यात येत असल्यामुळे अनेक समस्या निकाली निघत असल्याचे सांगितले. श्रीमती बारवरकर यांनी प्रास्ताविक केले. विशाल आनंद यांनी आभार मानले.

# धारणी उपजिल्हा रुग्णालयात जाणारे दोन्ही मार्ग खड्डेमय

## शहरातील या दोन रस्त्यांची शोकांतिकाच, नेते मंडळी सह अधिकार्यांचे दुर्लक्षच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१धारणी–** धारणी शहरातील अमरावती धारणी बऱ्हाणपूर या मुख्य रस्त्यापासून बुद्ध विहार ते उपजिल्हा रुग्णालय तर जयस्तंभ चौकापासून ते पोलीस स्टेशन मार्गे जाणारा उपजिल्हा रुग्णालयाचां रस्ता मागील दहा वर्षाच्या काळापासून खड्डेमय असून अतिशय दयनीय अवस्थेत आहे त्याकडे नगरपंचायत प्रशासनासह तालुक्यातील बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असल्यामुळे रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णांना दचके खात रुग्णालयात जावे लागत आहे ही या दोन रस्त्याची सर्वात मोठी शोकांतिका मानली जात आहे धारणी शहरांमध्ये मागील पाच वर्षांच्या कार्यकाळात नगरपंचायत प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत अनेक ठिकाणी रस्त्याचे लोक निर्माण कार्य केले शहरात सह परिसरातील आजूबाजूच्या गाव खेड्यात रस्त्याचे जणू काही त्यांनी जाळेच विणले परंतु अमरावती धारणी बऱ्हाणपूर मुख्य महामार्ग लगत असलेल्या बुद्ध विहार ते उपजिल्हा रुग्णालय व त्याच उपजिल्हा रुग्णालयाला दुसरा मार्ग म्हणजे जयस्तंभ चौक पोलीस स्टेशन मार्गे उपजिल्हा रुग्णालय या दोन्ही मार्गाची अतिशय दयनीय अवस्था झाली असून याकडे कोणत्याही विभागाने अद्याप पर्यंत लक्ष दिले नसल्याने उपजिल्हा रुग्णालयात उपचाराकरीता जाणाऱ्या संपूर्ण धारणी तालुक्यातील नागरिकांना रुग्णांना दचके खात जावे लागत आहे तर या उपजिल्हा रुग्णालयातून रेफर रुग्णांना अमरावती रुग्णालयात उपचाराकरिता पाठवले जाते त्या रुग्णांना रुग्णवाहिकेत नेत असताना सुरुवातीलाच दचके खात जावे लागत आहे तर तिकडे घाट वळणाच्या रस्त्यात तर खड्डे मय रस्तयामुळे आणखीनच त्यांची दयनीय अवस्था होत आहे याकडे तालुका प्रशासनाचे दुर्लक्ष झाले असून या रस्त्याची अवस्था कधी बदलणार या कडे शहरवासीयांसह तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे

उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य सेवा देणारे वैद्यकिय अधिकारी आरोग्य विभागात कार्यरत असलेले कर्मचारी यांची मोठी वसाहत उपजिल्हा रुग्णालयाच्या निवासस्थानांमध्ये आपले वास्तव करत आहे त्यांना दरवेळेस या रस्त्याचा सामना करावा लागत आहे त्या रस्त्यातून जाताना त्यांची अनेकदा तारेवरची कसरतच होते तर कित्येकांना गाडी स्लिप झाल्याने अपघाताचा सामना करावा लागला तरीसुद्धा तालुका व शहर प्रशासनाने याकडे लक्ष दिले नाही याबाबत साथ संगतीने काम करनाऱ्या कर्मचार्यांनी वारवार तोंडी सांगून सुद्धा रस्ते दुरुस्त होत नसल्याची शोकांतिकाच मानली जात आहे

उपजिल्हा रुग्णालयात जाणार रस्त्याची अवस्था दैन्य झाली आहे तेथे उपचाराकरता येणाऱ्या रुग्णांना दचके खात रुग्णालयात जावे लागत आहे याकडे प्रशासनासह शहरातील प्रतिष्ठित नागरिका सह आमदार महोदयांनी लक्ष घालण्याची गरज आहे – **सचिन उपाध्याय** नागरिक धारणी–



# पालकमंत्री बावनकुळेंकडून डॉ. नितीन धांडेंचा सत्कार

## भाजपासह युवा स्वाभिमानचे शेकडो पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती–** शौर्य सन्मान पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. नितीन धांडे यांचा आज जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हृदय सत्कार केला. यावेळी भाजपा सह युवा स्वाभिमांचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अमरावती जिल्ह्याला पहिल्यांदाच नितीन धांडे यांच्या माध्यमातून शौर्य सन्मान पुरस्कार प्राप्त झाला आहे. पानिपत या ऐतिहासिक भूमीत मुख्यमंत्री व केंद्रीय मंर्त्याच्या उपस्थितीत शौर्य स्मारक ट्रस्टच्या वतीने शौर्य सन्मान पुरस्कार देऊन डॉ. नितीन धांडे यांचा सन्मान करण्यात आला होता. हा बहुमान प्राप्त झाल्याबद्दल आज डॉ. नितीन धांडे यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते भावपूर्णसत्कार करण्यात आला.

सामाजिक व राजकीय क्षेत्रात नितीन धांडे यांनी मोठे योगदान दिले आहे. प्रत्येक निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांचे निष्ठेने काम करून धांडे यांनी आपले निर्विवाद संघटन कौशल्य सिद्ध केले. सर्वांशी त्यांचे सलोख्याचे संबंध राहिले आहे. प्रत्येक निवडणुकीमध्ये भाजपाच्या सर्वच उमेदवारांचा त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करून प्रचार केला. पक्षासाठी एकनिष्ठ असलेले नितीन धांडे यांचे समाजासोबतच भाजपासाठी देखील मोठे योगदान राहिले आहे. त्यांचा सन्मान हा भाजपाचा सन्मान आहे अशा शब्दात पालकमंत्री बावनकुळे यांनी धांडे यांचा गौरव करून सत्कार केला. तसेच पुढील भावी यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी खासदार नवनीत राणा, आ.रवी राणा, आ.राजेश वानखडे, आ. प्रवीण तायडे,आ.केवलरं काळे सह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.–

# अंजनसिंगी शेतशिवारात चरतांना चाऱ्यातून विषबाधा

## मेंढपाळाच्या ६५ ते ७० मेंढ्या दगावल्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अंजनसिंगी–** अंजनसिंगी शेत शिवारात मेंढ्या चरत असतांना चऱ्यातून झालेल्या विषबाधेमुळे मेंढपाळ सुधीर शिंदे आणि गंगाधर शिंदे यांच्या ५ दिवसांच्या कालावधीत टप्प्या टप्प्याने सुमारे ६५ ते ७० मेंढ्या दगावल्यात. त्यामुळे हताश झालेल्या मेंढपाळ कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यांना शासकीय आर्थिक मदत करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.मेंढपाळ सुधीर शिदे मु. पो. कु हा ता. तिवसा, जि. अमरावती तसेच गंगाधर शिदे मु. पो. जळका जगताप ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती हे या गावातील रहिवासी असून ते भूमिहीन आहेत. ते मेंढपाळ असून प्रामुख्याने त्यांचा व्यवसाय परिवारासह घर – दार सोडून जंगलात मेंढीचे पालन करणे हा आहे. त्या व्यवसायातूनते त्यांच्या प्रपंचाचा उदरनिर्वाह चालवित असतात. सर्व सुरळीत चालू असतांना अचानक अंजनसिगी शेत शिवारात मेंढ्या चरत असतांना चाऱ्यातून झालेल्या विषबाधा झाली. त्यामुळे मेंढपाळ सुधीर शिंदे आणि गंगाधर शिंदे यांच्या ५ दिवसांच्या कालावधीत टप्प्या टप्प्याने सुमारे ६५ ते ७० मेंढ्या दगावल्यात.दगावल्यात. त्यामुळे हताश झालेल्या मेंढपाळ कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. सदर मेंढ्यांच्या कोणत्याही प्रकारचाविमा काढलेला नव्हता. हल्ली उर्वरित मेंढ्या अंजनसिगीच्या शेत शिवारात चरत आहे व त्या ठिकाणी जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयामार्फत मोबाईल ५ अँब्युलन्स व काही लोकांच्या टीमची व्यवस्था मा. उपायुक्त साहेब, जिल्हा पशुसंवर्धनविभाग, अमरावती यांनी करून दिली आहे. सदर नुकसानग्रस्त – मेंढपाळ यांनी सुमारे ७ ते ८ लाखांचे नुकसान झाले. त्यामुळे त्यांनी आत्महत्येकडे पाऊल उचललेहोते, परंतु काही लोकांनी त्यांच्या बेड्यावर जावून सांत्वना करून त्यांचे मनोबल, धैर्य वाढवले व त्यांना आत्महत्येपासून थांबवले. नुकसान ग्रस्त मेंढपाळ कुटुंबियांना शासकीय आर्थिक मदतीची तरतूद व्हावी व तशी मदत मिळावी जेणेकरून सदर मेंढपाळ आत्महत्येकडे वळणार नाहीत, अशी मागणी मा. पालकमंत्री, मा. जिल्हाधिकारी, मा. खासदार, मा. आमदार यांना निवेदनातून करण्यात आली. निवेदन देतेवेळी अमित महात्मे, निखिलघुरडे, श्यामबोबडे, अॅड. अचल कोल्हे, सुरेश लोथे आदी उपस्थित होते.

# आष्टी शेतशिवारात तूरीच्या पेंढ्याना आग, लाखोंचे पिक जळून खाक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती** नजिकच्या आष्टी शेतशिवारात पाच एकरावर कापून ठेवलेल्या तुरीच्या पेंढ्याना अचानक आग लागल्याने त्या जळून खाक झाल्या आहेत. हि घटना शुक्रवारी भर दुपारी १ वाजताच्या सुमारास घडली.त्यामुळे सुमारे दोन लाखांचे नुकसान झाले आहे.

भातकुली तालुक्यातील मार्की मार्गावर आष्टी येथील रहीवासी असलेल्या शोभा प्रकाश मोहकर यांचे शेत आहे. दोन दिवसांपुर्वी शेतात तुरीच्या पेंढ्या कापून ठेवल्या होत्या. दुपारी अचानक या पेंढ्यांना आग लागली. यामुळे शेतातून संपूर्ण तुर जळून खाक झाली. याची माहीती मोहकर यांना होताच त्यांनी शेताकडे धाव घेऊन अग्नीशमन दलाला याची माहिती दिली. घटनास्थळी अग्नीशमन दलाचे पथक देखील पोहचले. परंतु तोपर्यंत संपुर्ण तुर जळून खाक झाली. घटनास्थळी मंडल अधिकारी राठोड, पटवारी रायबोले, पोलीस पाटील प्रवीण प्रधान यांनी भेट देवून पंचनामा केला. यामध्ये सुमारे दोन लाख रूपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

# पालकमंत्र्यांची महानुभाव आश्रमाला भेट

## महंत कुळाचार्य कारंजेकर बाबांच्या हस्ते सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती –**
पालक मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारला दुपारी कंवरनगर स्थित महानुभाव आश्रमाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी दर्शन पूजन केले. त्यानंतर आश्रमाच्या वतीने ना. बावनकुळे यांचा शाल श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह आणि फेटा देवून महंत कुळाचार्य कारंजेकर बाबा (मोहनदादा) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना आश्रमाच्या वतीने सप्तग्रंथ आणि शताब्दी निमित्त प्रकाशित आश्रमाची स्मरणीका भेट देण्यात आली. या वेळी महंत कुळाचार्य कारंजेकर बाबा



(मोहनदादा)यांच्यासह आ. रवि राणा,आ. राजेश वानखडे, आ. प्रवीण तायडे, किरण पातुरकर,लप्पी भेया, सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# डफरीनची नवी इमारत धूळखात; रुग्णांसाठी तत्काळ सुरू करा

## प्रहारच्या नेतृत्वात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती–** जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) येथे महिला रुग्णांना मोठ्या प्रमाणात समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या परीसरात दोनशे खाटांची अतिरिक्त इमारत तयार करण्यात आली. गत पाच महिन्यांपूर्वी इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. प्रत्यक्षात मात्र, ते रुग्णालय धूळखात पडून आहे. ते तत्काळ सुरू करावे. या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना शुक्रवारी (दि.३१) निवेदन दिले.जिल्हा स्त्री सामान्य रुगणालयाची नविन इमारतीचे ५ महिन्याआधी लोकप्रतिनिधींच्या हस्ते उद्घाटन झाले. परंतु, अजूनही स्त्री रुणांच्या सेवेत ती ईमारत आलेली नाही. नविन इमारतमध्ये २०० खाटांची सुविधा आहे. मात्र, बेड २०० आणि रुण २३० ते २५० असतात, त्यामुळे ही इमारतसुद्धा अपुरी पडणार आहे. नवीन इमारतीत असुविधा असल्याने ती रुणांच्या सेवेत येत नाही. त्या ठिकाणी मनुष्यबळ १६०, कंत्राटी कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, मेस, क्लीनर, स्त्री रोगतज्ञ सह विविध डॉक्टर तज्ज्ञांची आवश्यकता आहे. यासर्व समस्यांवर तोडगा काढून रुग्णालयाची नवीन इमारत सुरू करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रमुख छोटू महाराज वसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके, संपर्क प्रमुख गोलू पाटील, अभिजित देशमुख, श्याम इंगळे, अभिजित गोंडाणे, शेख अकबर, नंदू वानखडे, शेषराव धुळे, मनीष पवार, विक्रम जाधव, अजय तायडे, कुणाल खंडारे, अमन गौरवे, निरंजन ठाकरे, शिव सदाफळे आदी उपस्थित होते.–

# केकदाखेडा गावाजवळ वाघाची डरकाळी

## २०१८ ची पुनरावृत्ती होणार का ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मेळघाट**
धुळघाट रेल्वे वनपरिक्षेत्रातील केकदाखेडा गावाजवळच्या जंगलातून दररोज पहाटे वाघाची डरकाळी ऐयकायला येत असल्याने आदिवासी पार घाबरलेले आहेत. सातवर्षापूर्वी या गावाजवळीलच मुलगी बास्की डावर (वय ७वर्ष) हिला वाघाने हल्ला करून जखमी केलेले होते. म्हणूनगावकरीयावेळी अज्ञात भयाने ग्रस्त वाटत आहेत. धारणी पासून १९ कि.मीअंतरावरील केकदाखेडा गावालगत मागील तीन दिवसांपासून रात्री व अगदी पहाटे वाघाचा संचार होत आहे. केकदाखेडा गावातील अनेक नागरिकांनी गावाजवळ फिरणाऱ्या वाघाची डरकाळी ऐकल्याने पार



प.स. नोंदविला गेला होता. सात–आठ वर्षांपूर्वी पहाटे घाबरलेले आहे. अकोट वन्यजीव विभागातील वनकर्मचारीसतिश अकोटे यांनील पण या घटनेची पुष्टी केलेली आहे. सनद असोकी, केकदाखेडागाव हे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाच्या निर्देशानुसार वसलेले आहे. शासनाने तीन वेळा गावपुनर्वसित करण्यासाठी उजाड केलेले होते. अखेर ग्रामस्थांनी उच्च न्यायालयात दाद मागून गावाची मान्यता प्राप्त केल्यानंतरच गाव म्हणून केकदाखेडा धारणी वाघाने गावातील घरात झोपलेल्या बास्की राजु डावर (वय ७वर्षे) या मुलीस जखमी केलेले होते. आता पून्हा वाघाचा संचार गावाजवळ वाटतआतापून्हा वाघाचा संचार गावाजवळ वाटत असल्याने आदिवासी घाबरलेले आहेत. वाघ्र प्रकल्पाने या वाघाचा बंदोबस्त करावा यासाठी कॅमेरे लावणे, त्याच्या पगमार्क प्रमाणे चौकशी करणे सह विविध उपाययोजना असून आदिवासींचे रक्षण करण्याची मागणी आहे.

# पीडीएमसीमधील आपत्कालीन विभागाच्या तज्ञ चमूकडून बेलोरा विमानतळाची तपासणी

## लवकरच होणार विमानतळ सुरु, अमरावतीकरांची प्रतिक्षा संपणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती–**
अमरावती येथील नव्याने उदयास येत असलेले बेलोरा विमानतळ लवकरच कार्यान्वित होणार आहे. प्रवासी आणि कर्मचारी यांच्या सुरक्षिततेसाठी विमानतळावरील आरोग्य सेवा उच्च दर्जाची असणे आवश्यक आहे. याकरिता पीडीएमसीमधील आपत्कालीन विभगणाच्या तज्ञ चमूने बेलीस विमानतळाची पाहणी केली.डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख मेमोरियल मेडिकल कॉलेज येथीलआपत्कालीन विभागा अंतर्गत विमानतळाची आपत्कालीन पाहणी वैद्यकशाख



विभागप्रमुख डॉ. पी.आर. सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. सहायक प्राध्यापक डॉ. सुदेश दारव्हेकर आणि ज्येष्ठ निवासी डॉक्टर स्वप्नील पाटील यावेळी हे उपस्थित होते. विमानतळावर आपत्तीजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास, आपत्कालीन वैद्यकीय चमूची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. शक्य तितक्या अधिक लोकांना वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी आणि आपत्ती नियंत्रित करण्यासाठी कायदा अंमलबजावणीअधिकाऱ्यांसोबत समन्वय साधणे आवश्यक असते. प्राथमिक आणि दुय्यम सर्वेक्षण, आपत्ती तयारी आणि निवारण या विषयांवर चर्चा करण्यात आली.

# तिवसा तालुकास्तरीय भजन स्पर्धा उत्साहातपुरुष गटात आदर्शग्राम भजन मंडळ शेंदोळा प्रथम

## माजी मंत्री यशोमती ठाकूर यांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती –** युवक कल्याण संस्था मोझरी द्वारा स्व भैय्यासाहेब ठाकुर जयंती व स्व कुमारसाहेब ठाकुर यांच्या पुण्यतिथी निमीत्त माजी मंत्री यशोमतीताई ठाकुर यांच्या माध्यमातून तिवसा तालुका स्तरीय भव्य महिला पुरुष व बाल गट भजन स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती.



महाराष्ट्रतील संत परंपरा संतांचा मानवतेचा विचार जनमाणसात रुजावा या उद्देशाने गेल्या तीन वर्षपासुन सातत्याने याभजन स्पर्धेच आयोजन करण्यात येत आहे.या मध्ये तिवसा तालुक्यातील ११० मंडळांनी सहभाग नोंदवला १ लक्ष रुपयांची आकर्षक पारितोषिके स्पर्धकांना करीता होती. यामध्ये पुरुष गटात प्रथम क्रमांक आदर्शग्राम भजन मंडळ शेंदोळा द्वितीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजन मंडळ निभोरा. दे तिसरे बाल गट प्रथम क्रमांक गुरुकृपा बाल भजन मंडळ तिवसा चौथे राष्ट्रसंत गुरुकृपा भजन मंडळ तळेगाव ठाकुर पाचवे बाल गट दुसरा क्रमांक



श्री गुरुदेव बाल भजन मंडळ घोटा सहावे स्व.गोपाल महाराज भजन मंडळ तिवसा सातवे बाल गट तिसरा क्रमांक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज बाल भजन मंडळ शेंदोळा आठवे समर्थ आडकोजी महाराज भजन मंडळ वरखेड नऊवे गुरूदेव सेवा भजन मंडळ मालधुर दहावे संत लहानुजी महाराज भजन मंडळ शेदुरजना बाजार अकरावे संत गजानन महाराज भजन मंडळ तिवसा तर महीला विभागात प्रथम समर्थ आडकोजी महाराज महीला भजन मंडळ वरखेड द्वितीय श्री गुरुदेव महिला भजन मंडळ शेंदोळा तिसरे श्री गुरुदेव महिला भजन मंडळ सुरवाडी चौथे रामकृष्ण हरी महिला भजन मंडळ गुरूदेव नगर पाचवे जय भवानी महिला भजन मंडळ सुरवाडी सहावे संत लहानुजी महाराज महिला भजन मंडळ मुर्तिजापुर तरोडा सातवे जय माऊली महिला भजन मंडळ तिवसा आठवे गुरुमाऊली महिला भजन मंडळ अमर चौक तिवसा नऊवे सत्संग महिला भजन मंडळ शेदुरजना बाजार ल्लदहावे गुरुमाऊली महिला भजन मंडळ सातगाव अकरावे रमाई महिला भजन मंडळ सुलतानपुर यांनी पटकविले य स्पर्धेचे परीक्षन महाराष्ट्रतील सुप्रसिद्ध गायक गोपालजी सलोडकर परागजी पदवाड यांनी केले तर सुत्रसंचालन डॉ रघुनाथ वाडेकर व श्री कृष्ण पखाले यांनी व स्पर्धेचे व्यवस्थापन नगरसेवक अमर वानखडे यांनी केले स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी रोशन ठाकरे मंगेश राउत गौरव चौधरी यांनी परिश्रम घेतले.

# अचलपूर नपा कोट्यावधी रुपयाचा गैरवापर

## जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनाला अभिप्राय पाठवण्यास टाळाटाळ

## रिपाईचे अध्यक्षांकडून आमरण उपोषणाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १ अचलपूर**

शासकीय अनुदानित कोट्यावधी रुपयाच्या निधीचा कायमस्वरूपी गैरवापर झाल्याचा अभिप्राय जिल्हाधिकारी कार्यालयाने त्वरित महाराष्ट्र शासनाकडे सादर न केल्यास आमरण उपोषणाचा इशारा रिपाई चे शहर अध्यक्ष किशोर मोहोड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिलेला आहे याबाबत रिपाईचे शहर अध्यक्ष किशोर मोहोड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले लेखी निवेदन असे की अचलपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी २०१०ते२०१८ या कालावधीत४७४८११८१३ रुपये शासकीयअनुदानित निधीचा कायमस्वरूपी गैरवापर केल्याने शासनामार्फत दोषींवर फौजदारी कार्यवाही दंड संहितेच्या



तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी दि २३/२/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय यांना पत्र दिले होते अद्याप दोन वर्ष झाल्यानंतरही सदरचा अभिप्राय पाठवलेला नाही वास्तविक दलीत वस्ती निधीचा गैरवापर झाल्याचे सिद्ध झाले आहे अभिप्राय शासनाला सादर केला जात नसल्याने भ्रष्टाचाऱ्यांना रान मोकळे झालेले आहे पंधरा दिवसाच्या आत सदर अभिप्राय महाराष्ट्र शासनाकडे न पाठवल्यास जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषणास बसेल.

**किशोर मोहोड, रिपाई अध्यक्ष अचलपूर**

कलम११७,११८,४०९ अन्वये गुन्हा दाखल करणे तथा संचालनालय स्थानिक निधी लेखा विभाग मुंबई यांचे कार्यालयाविरुद्ध नियमाप्रमाणे कारवाई करणेबाबत या संदर्भात उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक२५/११/२०२२ रोजी लेखी तक्रार केली होती त्या अनुषंगाने आपल्याकडे दिनांक २३/२/२०२२ ला पत्र प्राप्त झाले होते त्या पत्राच्या आधारे नगरपरिषद अचलपूर यांनी १२ जानेवारी२०२४ तारखेत आपल्या कार्यालयात नगरपरिषद अचलपूरचे मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड यांनी वळती निधीचा तपशील सादर केला आहे केंद्र व राज्य शासकीय योजनांचा प्राप्त निधी ज्या प्रयोजनासाठी अनुज्ञेय आहे त्यावर खर्च झाल्याचे दिसून येत नाही सदरचा निधी हा काही प्रकरणांमध्ये व्याजासहित निधी वर्ग करून शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे तसेच शासन मान्यतेचे किंवा शासन मंजुरीचे अनुज्ञेय बाबीवर खर्च न करता वेगळ्या प्रयोजनासाठी खर्च केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते म्हणजेच नगर परिषद अचलपूर यांनी मान्य केले किती शासकीय निधी वळती करून भ्रष्टाचार झाला आहे तसेच दिनांक ३१/१०/२०२३ रोजी विनोद गायकवाड सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा अमरावती विभाग अमरावती यांनी नगरपरिषद अचलपूर निधीवर वळती केल्याचा तपशील आपल्या कार्यालयात सादर केला आहे तरी आपल्या कार्यालयाकडून उपमुख्यमंत्री यांना२०१०-११ ते २०१८-१९पर्यंत ज्या मुख्याधिकाऱ्यांनी निधी वळती करून शासकीय निधीचा दुरुपयोग केला त्यांच्या नावासहित महाराष्ट्र शासनाला अभिप्राय सादर करावा अन्यथा मी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसेल असाही इशारा त्यांनी दिलेल्या पत्राद्वारे दिला आहे

# 'एसटी'च्या 'आवडेल तेथे प्रवास' आजपासून महागला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.अमरावती**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने नुकतीच एसटी बस दरात १५ टक्क्यांची वाढ केली आहे. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या लालपरीचा प्रवास महागला आहे. सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागली असतानाच आता एसटी महामंडळाच्या आवडेल तेथे कोठेही प्रवास या सवलत योजनेच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने आवडेल त्या ठिकाणी कोठेही प्रवास करण्यासाठी आवडेल तेथे कोठेही प्रवास ही सवलत योजना प्रवाशांसाठी MSRTC मार्फत राबविली जाते. या योजनेअंतर्गत ७ दिवस व ४ दिवस याप्रमाणे बसेच्या प्रकारानुसार तसेच आंतरराज्यांसह प्रवास सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. या योजने अंतर्गत येणाऱ्या बससेवांचे प्रतिटप्पा दरात वाढ करण्यात आली आहे. नवीन टप्पा दरपत्रकाप्रमाणे देण्यात येणाऱ्या पासचे सुधारीत दर, अटी व शर्ती लागू करण्यास सक्षम प्राधिकारी यांनी मंजुरी दिली आहे. हे दर १ फेब्रुवारी २०२५ पासून अंमलात येणार आहे.

# आरटीई : जिल्ह्यात ७,५५८ बालकांचे प्रवेश अर्ज सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

आर्थिक दुर्बल घटकातील पाल्यांना नामांकित खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. आरटीई प्रक्रियेला जिल्ह्यात पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यात २ हजार ४३० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. शुक्रवारी सायंकाळपर्यंत ७ हजार ५५८ प्रवेश अर्ज सादर करण्यात आलेत. प्रक्रियेसाठी एक दिवस शिल्लक उरला आहेत. त्यामुळे याला मुदतवाढ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.जिल्ह्यात आरटीई प्रक्रियेला १६ डिसेंबरपासून सुरुवात करण्यात आली. यामध्ये ४ जानेवारीपर्यंत पहिल्या टप्यात शाळा नोंदणीची प्रक्रिया राबवली. दरम्यान १५ जानेवारीपासून ऑनलाइन अर्ज करण्यास प्रारंभ झाला असून, ३१ जानेवारीला सायंकाळी ७ पर्यंत जिल्ह्यात ७हजार ५५८ अर्ज प्राप्त झाले होते. यंदा गतवर्षी पेक्षा अधिक अर्ज दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रक्रियेनंतर प्राप्त अर्जामधून लॉटरी काढण्यात येणार आहे. या लॉटरीमध्ये नशिबवान बालकांचे प्रवेश स्वीकारले जाणार आहे.

# विद्यापीठात ३ फेब्रुवारी रोजी आयडिएट २.० कार्यक्रमाचे आयोजन

## रिसर्च अ‍ॅन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन व अमरावती मॅनेजमेंट असोसिएशनचा संयुक्त उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन व अमरावती मॅनेजमेंट असोसिएशनच्यावतीने ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.०० वा. विद्यापीठ परिसरातील ए.व्ही. थिएटर येथे 'आयडिएट २.०' प्री-इन्क्युबेशन फॉर स्टार्टअप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सन्माननीय अतिथी म्हणून हॅप्पीटर्स.एआय आणि बेबी व्हर्स.एप चे सह-संस्थापक श्री. शशिकांत चौधरी, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, अमरावती मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्ष श्री. रणजित बंड, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर, सीए मोहित गणेशानी, एसजीबीएयू रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशनचे सीईओ श्री. आनंद यादव, बिझनेस इन्क्युबेटर मॅनेजर अमोल हिरुळकर यांनी केले आहे.


## सुबत्तेच्या दिशेनं भारताची वाटचाल

शेतकरी, कर्मचारी, मध्यमवर्गीय सर्वसामान्य माणसांना तसेच कॅन्सरच्या औषधांवरील कस्टम ड्युटी हटवण्याचा निर्णय या



अर्थसंकल्पात आहे आत्मनिर्भर भारताच्या मोहिमेला बळ देणारं आणि सर्व भारतीयांचं स्वप्न पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन करतो,

**प्रताप अडसड, आमदारधामणगाव रेल्वे**


# राणीगावात भव्य भागवत सप्ताह सह रक्तदान शिबिर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१धारणी**

धारणी तालुक्यातील राणीगाव परिसरातील धार्मिक भक्ता करीता राणीगाव गावातील हनुमान मंदीरात भव्य भागवत सप्ताह व ३६५ दिवस खासदार रक्तदान मोहीम अंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते त्यात २० रक्त दात्यानी रक्तदान केले तर हजारो धार्मिक भक्तांनी भव्य भागवत सप्ताह चां लाभ घेतला.

राणीगाव परिसरातील धुळघाट रेल्वे ,सुसर्दा ,सावलीखेडा, गोलाई सह इतरही ग्रामीण भागातील भाविक भक्तांसाठी दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा राणीगाव ग्राम वासीयांनी भव्य भागवत सप्ताहाचे आयोजन केले होते भागवतकार महंत कृष्णानंद जी भारती हनुमान मंदिर यांचे प्रवचन होते त्या प्रवचनाचा लाभ परिसरातील धार्मिक भाविक भक्तांनी मोठ्या आनंद उत्सवाने घेतला तर राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांच्या ३६५ दिवस सतत खासदार रक्तदान मोहीम अंतर्गतरक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच श्रेष्ठदान, असून समाज घटकातील प्रत्येक नागरिकांमध्ये दातृत्वभाव ही संकल्पना साकारण्याचा उदात्त दृष्टिकोन जपून भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष आप्पा पाटील यांच्या पुढाकाराने राणीगावातूनही २० बॅग रक्तपिशव्या जमा करून गरजवंताना रक्त पुरवठा करण्यात हातभार लावलायाप्रसंगी गावचे प्रतिष्ठित नागरिक तथा भागवत कथा आयोजक सरपंच लक्ष्मण भैय्या भीलावेकर, ग्रामसेवक मळसणे साहेब, पोलीस पाटील काशीरामजावरकर, सामाजिक कार्यकर्ते भीमराव जावरकर, बहादूरसींग कास्देकर, प्रल्हाद लटपटे, मोहनलाल भीलावेकर, कुंजीलाल तांडील, गंगाराम जांबेकर, हनुमंता गुट्टे तथा इतर जेष्ठ मान्यवर उपस्थित होते.

### आठवडा भर घरी चुली पेटल्या नाही २४ दानदात्यानी केले महाप्रसादा चे दान

भव्य भागवत सप्ताह दरम्यान आठ दिवस रानीगाव गावात एकाही घरी चूल पेटली नाही ..पूर्ण गांवकरीं चा चहा, नाश्ता, दोन वेळ जेवण भागवत सप्ताह स्थळीच आयोजकांनी आयोजित केले होते त्याकरिता गावातील किरण सिंग ठाकूर ,रमेश सावळकर, गोकुळ जांभेकर, साहेबराव सावरकर, संदीप मावसकर, रवी धांडे ,भरतसिंग गुलाबसिंग ,राजेश मावसकर, जगन्नाथ भिलावेकर ,दिनेशभिलावकर ,मोहन भिलावकर, किशोर सावलकर, श्रीकृष्ण कासदेकर ,दीपक जावरकर, मनोज जावरकर, रामेश्वर कासदेकर, जयराम सावरकर, सुभाष चव्हाण ,अजय नागपूरकर , व सरपंच लक्ष्मण भीलावेकर ,बिरसा मुंडा मंडळ राणीगाव या दानदात्यांनी दररोज दोन वेळच्या महाप्रसादा सह नास्त्याचे भाविक भक्ता करीता दान केले .

# ३ सरपंच, २ उपसरपंचासाठी ६ फेब्रुवारीला जिल्ह्यात निवडणूक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**

जिल्ह्यात पाच ग्रा. पं. मध्ये तीन सरपंच, दोन उपसरपंच पदाकरिता ६ फेब्रुवारीला निवडणूक लावण्यात आली आहे. या पाच पदांसाठी सकाळी ११ वाजता निवडणूक प्रक्रिया सुरू होणार आहे. यामध्ये भातकुली तालुक्यातील सरपंच पद हे थेट निवडीतून असल्याने येथील निवडणूक रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानंतर खोलापूर ग्रा. पं.ची निवडणूक घेण्यात येणार आहे.

निधन, राजीनामा, अपात्र व अन्य कारणांमुळे रिक्त झालेले सरपंच, उपसरपंच पदांकरिता निवडणूक विभागाच्या वतीने निवडणूक लावली जात आहे. अशातच रिक्त झालेल्या पाच ग्रा. पं. मधील तीन सरपंच, दोन उपसरपंच पदाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये धारणी तालुक्यातील चेंडो ग्रा. पं.चे सरपंचपद अनुसूचित जमातीकरिता राखीव असून, या पदाकरिता निवडणूक होत आहे. याशिवाय भातकुली तालुक्यातील कवठा बहाळे सरपंच, तिवसा तालुक्यातील वरखेड सरपंच, चांदूर रेल्वे तालुक्यातील चिरोडी उपसरपंच व दर्यापूर तालुक्यातील कोळंबीचे उपसरपंच या पदांकरिता ६ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे. खोलापूरचे सरपंच पद रिक्त असून, येथील सरपंच हे थेट नागरिकांमधून निवडून आल्याने या ग्रा.पं.चा निवडणूक कार्यक्रम आयोगाने सुचवलेल्या कार्यक्रमानंतर लागणार आहे.

# शाहिद स्मृती हॉली बॉल क्लब द्वारा भव्य हॉलीबॉल स्पर्धा

## आमदार उमेश यावलकर यांच्या हस्ते भव्य हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन : देशभरातील संघांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१वरुड**

बेनोडा शहीद येथे शाहिद स्मृती हॉलीबॉल क्लब द्वारा आयोजित अखिल भारतीय हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. उमेश उर्फ चंदू यावलकर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शहीद स्मृती हॉलीबॉल क्लबने एक भव्य क्रीडा कार्यक्रम आयोजित केला होता, ज्यात विविध राज्यांतील आणि गावांतील खेळाडूंनी भाग घेतला. आमदार उमेश यावलकर यांनी आपल्या भाषणात स्वर्गीय संजयभाऊ कुबडे यांना अभिवादन करत त्यांचे हॉलीबॉलवरील प्रेम आणि त्याच्या योगदानाचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, स्वर्गीय संजय भाऊंचा हॉलीबॉलवरील जिव्हाळा आणि त्यांचं योगदान आपल्या सर्वांनाच माहीत आहे. आज या स्पर्धेचे आयोजन त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ करण्यात आले आहे. जर ते हयात असते, तर ते अत्यंत आनंदी झाले असते. आमदार यावलकर यांनी आपले भावनिक शब्द बोलताना संजय भाऊंच्या आठवणींना उजाळा दिला.



स्मृती म्हणून यावलकर यांनी भविष्यात गावात एक आधुनिक क्रीडा संकुल मंजूर करून देण्याचा विश्वास व्यक्त केला. ज्या जागेवर आज हा कार्यक्रम आयोजित केला जात आहे, ती ग्रामपंचायतच्या ताब्यात १७,००० स्क्वेअर फीट क्षेत्र आहे. या जागेवर एक सुंदर स्टेडियम उभारले जाऊ शकते, जे संजय भाऊंच्या स्मृतीला चांगलेच साजेसे असेल, असे त्यांनी सांगितले. या स्टेडियमाच्या माध्यमातून खेळाडूंना उत्तम सुविधा पुरवण्यात येतील, ज्यामुळे खेळांची गुणवत्ता आणि खेळाडूंचे प्रोत्साहन वाढेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. आमदार यावलकर यांनी आपल्या भाषणात बेनोडा वासीयांचे आभारही व्यक्त केले. बेनोडा येथील नागरिकांनी मला मोठ्या मताधिक्याने निवडून दिले, यासाठी मी त्यांचा मनापासून आभारी आहे. आगामी काळात माझ्या वतीने बेनोडा गावासाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयी सुविधांची पूर्तता केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. बेनोडा आणि त्याच्या आसपासच्या गावांसाठी जे काही विकास करता येईल, त्यामध्ये पूर्ण सहकार्य राहील. तसेच माझ्या वतीने या सर्व कार्यांना पूर्ण मदत केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. शेवटी, आमदार यावलकर यांनी जय हिंद, जय महाराष्ट्र या उद्घोषणासह अखिल भारतीय हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन जाहीर केले. या कार्यक्रमात अनेक खेळाडू, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनामुळे क्रीडा क्षेत्रात निश्चितच विकास होईल, असा विश्वास आमदार उमेश यावलकर यांनी व्यक्त केला.

